# आयुक्तालय,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,


**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**

**(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)**

रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई ४००६१४

Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022-27576324


**दिनांक**:13.08.2026.

## प्रसिध्दीपत्रक

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत **फक्त शहरी विभागात कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविकामधून** मुख्यसेविका पदोन्नती कोटयातील निवडीने या प्रकारातील रिक्त पद भरती परिक्षा संदर्भात ऑनलाईन अर्ज सादर करणाऱ्या सेविकांसाठी मुख्य सुचना.

**मुख्य पात्रता निकष** :-

1. ज्यावर्षी विभागीय परिक्षेचे आयोजन करणे प्रस्तावित आहे त्या वर्षी 1 जानेवारी रोजी सलग 10 वर्ष विनाखंड नियमित सेवा पूर्ण केलेल्या सेविका **(दिनांक 01.01.2025 पर्यंत)**
2. दिनांक 01.01.2025 रोजी वय 50 वर्षापेक्षा जास्त नसेल; **(म्हणजेच 01/01/1975 नंतर जन्मलेल्या)**
3. संवैधानिक विद्यापिठाची पदवी धारण करणाऱ्या सेविका.
4. मुख्यसेविका / पर्यवेक्षिका या पदावर रुजू झालेच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र व मराठी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल तसेच हिंदी भाषा परीक्षा तीन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. सदर पात्रता धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ व पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

**पात्रता निकष हे वरील प्रमाणे राहणार असून या बाबत अतिरिक्त सुचना खालील प्रमाणे देण्यात येत आहे**.

1. संदर्भीय पत्र क्र.2 दिनांक 25.04.2025 रोजीच्या पत्रान्वये, दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने पदोन्नती कोटयातील निवडीने या प्रकारासाठी रिक्त पद भरती परिक्षासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेले असुन ज्यांना (Successfully Submitted) असा मॅसेज प्राप्त झालेला आहे व ज्यांनी **फी** स्वरुपात देय असणारी रक्कम भरली आहे. **त्यांना या भरती प्रसंगी पुनश्च ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही**.
2. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याचा **कालावधी दिनांक** 7.08.2026 **ते** 21.08.2026 **वेळ** 23.55 **पर्यत** राहिल.
3. अर्ज सादर करणे पुर्वी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल.
4. सदर भरती ही फक्त 104 नागरी प्रकल्पातील सद्यस्थितीत कार्यरत सेविकांसाठीच आहे.
5. ***अर्ज करताना येणाऱ्या अडचणी संदर्भात** Helpline Number 9594533203 **देण्यात येत आहे**.